महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

शनिवार ■ 01 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 217 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आज केंद्रीय अर्थसंकल्प

## मध्यमवर्गासाठीही 'शुभ'संकेत?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन 1 फेब्रुवारी रोजी आर्थिक वर्ष 2025-26 साठीचा अर्थसंकल्प संसदेत सादर करणार आहेत. त्याआधी भारतीय शेअर बाजार, सराफा बाजारात मोठे चढउतार पाहायला मिळत आहेत. या अर्थसंकल्पात नेमकं कोणाला दिलासा मिळणार, कोणाच्या खिशाला कात्री लागणार? याचे अंदाज लावले जात आहेत. दरम्यान, अर्थसंकल्पाच्या एक दिवस अगोदर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या वक्तव्याचे अनेक अर्थ काढले जात आहेत.

### अर्थमंत्री निर्मला सीतारमण सादर करणार अर्थसंकल्प

अर्थमंत्री निर्मला सीतारमण 1 फेब्रुवारी रोजी लोकसभेत 2025-26 चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सलग आठव्यांदा सीतारमण अर्थसंकल्प सादर करणार आहेत. विशेष म्हणजे, सलग आठ केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या पहिल्या अर्थमंत्री ठरणार आहेत.

### मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळासाठी यंदाचा अर्थसंकल्प

मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळासाठी यंदाचा अर्थसंकल्प अनेक अर्थांनी विशेष असणार आहे. कारण या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींमधूनच आगामी वर्षांच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे. दरम्यान, हा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना लक्ष्मी मातेने दशातील गरीब, मध्यमवर्गावर आपली कृपादृष्टी कायम ठेवावी अशी इच्छा व्यक्त केली. त्यामुळेच त्यांच्या या विधानाचे वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. हाऊसिंग सेक्टरमध्ये तेजी यावी यासाठी सरकार काही नव्या योजनांची घोषणा करू शकते. यासह सरकार भारतीय रिझर्व्ह बँकेशी चर्चा करून व्याज दरांत कपात करून नागरिकांना दिलासा देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.सोबतच इंधन, खाद्य तेलाच्या किमती नियंत्रित करण्यासाठीही काही ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.

यावेळच्या अर्थसंकल्पात सरकार पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेचा विस्तार करू शकते. सोबतच मनरेगा या योजनेतही काही बदल होण्याची शक्यता आहे. यासह सरकार शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण यासाठीही भरघोस तरतूद करण्याची शक्यता आहे.



### याआधी सरकारचे कशावर लक्ष?

गेल्या काही अर्थसंकल्पांत सरकारने पुरठवा साखळी कशी मजबूत करता येईल, यावर लक्ष केंद्रीत केल्याचं दिसतं. सोबतच पायाभूत सुविधांचा विकास, विस्तार कसा करता येईल, यावरही सरकारने लक्ष दिलेलं आहे. सरकारने क्रिप्टोकरन्सी तसेच अन्य धनसंपत्तींवर करवसुली करण्याचीही तरतुद याआधी केलेली आहे. याचा मध्यमवर्ग आणि श्रींमंतावर जास्त परिमाण झालेला आहे. असे असताना लक्ष्मी मातेची गरीब आणि मध्यम वर्गावर कृपा असावी, अशी प्रार्थना केली आहे.

### यंदा सरकार कोणाच्या पाठीशी ?

यावेळी सरकार मध्यमवर्गाला दिलासा देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. टॅक्स स्लॅबमध्ये बदल करून हा दिलासा दिला जाऊ शकतो. तसेच नव्या करप्रणालीअंत र्गत सँडर्ड टिडक्शनच्या लाभामध्येही वाढ केली जाऊ शकते. सोबतच महागाई, खाद्यान्नांच्या किमतीत होणार वाढ नियंत्रित करण्यासाठीही सरकार यावेळी काही वेगळे निर्णय घेण्याची शक्यता आहे. त्यासाठी वेगवेगळया खाद्यपदार्थांवरील जीएसटीत घट केली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### मध्यमवर्गाला सूट समन्यांसाठी शुभाचे संकेत

सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात, ग्रामीण भागातील उत्पन्न वाढवण्यासाठी आणि महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार काही महत्त्वाच्या घोषणा करू शकते, असे मानले जात आहे. यामुळे डाबर, इमामी, एचयूएल आणि ब्रिटानिया यांसारखे शेअर्स फोकसमध्ये राहतील. मध्यमवर्गीयांना करात सूट मिळाल्यास नेस्लेसारख्या कंपन्यांना त्याचा फायदा होईल. कारण त्यांच्या महसुलाचा मोठा हिस्सा शहरी भागातून येतो. एनटीपीसी, टाटा पॉवर, जेएसडब्ल्यू एनर्जी, एनएचपीसी, एसजेव्हीएन, सीईएससी, अदानी पॉवर, अदानी एनर्जी सोल्युशन्स आणि केपी एनर्जीच्या गुंतवणूकदारांना विजेशी संबंधित घोषणेचा फायदा होऊ शकतो.



# संयुक्त घनकचरा प्रकल्प जलदगतीने पूर्ण करा

## - आयुक्त मनीषा आव्हाळे यांचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर - एमएमआरडीएच्या मार्फत उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या तीन शहरांच्या संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम बदलापुरातील वालवली येथे सुरू आहे. या प्रकल्पाची उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी पाहणी करून आढावा घेतला असून संबंधितांना लवकरात लवकर काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून उल्हासनगरातील डम्पिंग ग्राउंडवरील आगीच्या आणि धुराच्या लोटामुळे नागरिक विविध आजारांनी त्रस्त झालेले आहेत. हे ग्राउंड हटवण्यासाठी अनेकदा आंदोलने झालेली आहेत. स्थानिक प्रशासन आणि राज्य शासनाकडे तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. अंबरनाथ व बदलापूर क्षेत्रातही हीच समस्या निर्माण झालेली आहे. यावर मात करण्यासाठी राज्य शासनाच्या मंजुरीनंतर एमएमआरडीएच्या मार्फत बदलापुरातील वालवली भागात ८ एकरच्या जागेत उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर या तीन शहरांचा संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. हा प्रकल्प महत्वाचा असल्याने आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी वालवली मध्ये जावून आढावा घेतला असून, प्रकल्पाला गती देण्यात यावी. व लवकरात लवकर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात यावे. असे निर्देश त्यांनी संबंधित एमएमआरडीएचे अधिकारी आणि कंत्राटदार यांना दिले आहेत. यावेळी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, सहायक सार्वजनिक आरोग्य अधिकारी मनिष हिवरे, सहायक आयुक्त मयुरी कदम उपस्थित होते.

# मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी दिलीप सपाटे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या दि. ३१ जानेवारी रोजी झालेल्या द्वैवार्षिक निवडणुकीत 'हिंदुस्थान पोस्ट' चे राजकीय संपादक सुजित महामूलकर कार्यकारिणी सदस्य म्हणून विजयी झाले आहेत. तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी दैनिक पुढारीचे दिलीप सपाटे तर सरचिटणीसपदी दैनिक लोकमतचे दीपक भातुसे विजयी झाले आहेत.

या द्वैवार्षिक निवडणुकीत 'हिंदुस्थान पोस्ट'चे राजकीय संपादक सुजित महामुलकर यांना १०२ मते मिळाली असून कार्यकारणी सदस्यांच्या सर्वाधिक मतांमध्ये ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. कार्यकारणी सदस्यांमध्ये मनोज दुबे यांना १०४ मते मिळाली असून ते सर्वाधिक मते मिळवत पहिल्या क्रमांकांनी विजयी झाले. दरम्यान मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सर्वसाधारण वार्षिक सभेत सन २०२५-२६ आणि २०२६- २७ अशा दोन वर्षासाठी संघाची कार्यकारिणी निवडण्यात आली. या निवडणुकीत कोषाध्यक्षपदी विनोद यादव (दिव्य भास्कर), उपाध्यक्षपदी आलोक देशपांडे (इंडियन एक्स्प्रेस) निवडून आले. तर कार्यकारिणी सदस्य म्हणून मनोज दुबे ( हमारा महानगर) सुजित महामूलकर ( हिंदुस्थान पोस्ट), खंडूराज गायकवाड ( सांज महानगरी), प्रशांत बारसिंग (नवराष्ट्र) आणि राजन शेलार (पुढारी) विजयी झाले आहेत.

# दारूच्या बाटल्यांवरही कॅन्सरचा इशारा ?

## उच्च न्यायालयाचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सिगारेटच्या पाकिटाप्रमाणे दारूच्या बाटल्यांवरही कॅन्सरचा धोकदायक इशारा देणे बंधनकारक करावे, यासाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली आहे. या याचिकेवर उच्च न्यायालयाने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणला (एफएसएसआय) उत्तर देण्याचे निर्देश दिले. सिगारेटच्या पाकिटाप्रमाणे दारूच्या बाटल्यांवर कॅन्सरबाबत कोणताही धोकादायक इशारा न दिल्याने दारू सेवनाशी संबंधित आरोग्याचे धोके वाढतात. ग्राहकांना ते वापरत असलेल्या उत्पादनांची पूर्ण आणि अचूक माहिती मिळविण्याचा अधिकार आहे, असे पुण्याचे रहिवासी यश चिलवार (वय २४) यांनी जनहित याचिकेत म्हटले आहे. मद्यसेवनामुळे ३० लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. दक्षिण कोरिया आणि आयर्लंडसारख्या देशांनी आधीच दारूच्या बाटल्यांवरील लेबलवर कॅन्सरसंबंधी धोकदायक इशारा दिला आहे, असे याचिकेत म्हटले आहे.

# भाजप मुंबईत भाकरी फिरवणार ?


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं बिगूल वाजणार आहे. अर्थात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टात खटला न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी 25 फेब्रुवारीला सुनावणी पार पडणार आहे. सुप्रीम कोर्टाकडून लवकरच या प्रकरणावर निकाल जाहीर केला जाऊ शकतो. त्यानंतर लगेच राज्यात महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. यामध्ये मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचाही समावेश असणार आहे. ही निवडणूक आधी कोराना संकट आणि नंतर ओबीसी आरक्षणावरुन सुप्रीम कोर्टात सुरु असलेली सुनावणी यामुळे जवळपास 4 वर्षांपासून रखडली आहे. आता लवकरच ही निवडणूक होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत प्रत्येक पक्ष ताकद लावणार आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मुंबईत मोठी ताकद आहे. ठाकरे आणि मुंबई असं समीकरणच आहे. पण ठाकरेंच्या बालेकिल्ला काबीज करण्यासाठी भाजपकडून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. विशेष म्हणजे भाजपने आता तर मुंबईत भाकरी फिरवण्याची तयारी ठेवली आहे.

भाजप मुंबईत भाकरी फिरवण्याच्या तयारीत आहे. मुंबईतील निरुत्साही सदस्य नोंदणीची भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे. मुंबई महापालिका निवडणुका तोंडावर आहेत. असं असताना सदस्य नोंदणीच्या कामात संथपणा आडळून आल्याने त्याची वरिष्ठांनी गंभीरपणे दखल घेतल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे भाजपच्या प्रदेश कार्यालयात आज तातडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत आता काय निर्णय होतो? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

### रवींद्र चव्हाण आढावा घेणार

**भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण हे मुंबईत कामांचा आढावा घेणार असल्याची माहिती आहे. तसेच गरज भासल्याने भाकरी फिरवण्याची तयारी भाजपची आहे. त्यामुळे भाजपने भाकरी फिरवली तर मुंबईत कुणाला महत्त्वाच्या पदांची जबाबदारी मिळते ते पाहणं देखील तितकंच महत्त्वाचं आहे.**



# पर्यावरण समतोलासाठी माझी वसुंधरा अंतर्गत

## भिवंडी महानगरपालिकेचा अकिरा मियावॉकी (घनवन) प्रकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : पर्यावरणाच्या दृष्टीने माझी वसुधंरा ५.० अंतर्गत अकिरा मियावॉकी (घनवन) प्रकल्प कॅच फाऊडेशन, अहमदाबाद, गुजरात यांच्या विद्यमाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. ३ कार्यक्षेत्रातील स्थळ वऱ्हाळा तलावा लगत असलेले फेणे गांव पश्चिमेकडील उद्यान येथे उपलब्ध जागी घन वन जंगल प्रकल्पाचे उद्घाटन मा. श्री. अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त सो, भिवंडी मनपा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. भिवंडी शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पालिका प्रशासन कटिबद्ध असून त्यासाठी आकिरा मियावाकी घन वन जंगल प्रकल्प राबविले जात असून शहरातील हा चौथा प्रकल्प असून या माध्यमातून छोट्या जागेत तीन हजार वृक्ष लागवड केली जाणार आहे .त्यामुळे येथील नागरिकांना स्वच्छ हवेतील ऑक्सिजन मिळणार असून पक्षी मधमाशा फुलपाखर यांना हक्काचे निवासस्थान उपलब्ध होणार आहे असे प्रतिपादन भिवंडी पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे. शहराच्या काँक्रीट जंगलात हिरवळ असलेले उद्यान शोधावे लागत आहे.त्यामुळे शहरातील ऑक्सिजनची



गरज भागवणारे वन उभारणीची चळवळ जोर धरू लागली.आणि त्यासाठी जपानी मियावाकी पद्धतीचा अवलंब करून घन वन जंगल कमी जागेत उभारले जात आहेत. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात हफेले इंडिया प्रा लि.च्या सहकार्याने कॅच फाउंडेशन च्या माध्यमातून फेणेपाडा येथे 3 हजार झाडे लावून घनवन जंगल विकसित करण्यात येत असलेल्या या उद्यानात 70 विविध प्रजातीच्या फळ,फुल वनस्पती वृक्ष लागवड केली जाणार आहे.याआधी अशाच पद्धतीने तीन ठिकाणी प्रकल्प राबवण्यात आला आहे.

शहरात आता पर्यंत तीन मियावकी उद्यान विकसित करण्यात आले असून ही चौथे उद्यान उभारले जात आहे.ज्यामुळे शहरात पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल व येथील नागरिकांना विरंगुळा देणारे उद्यान विकसित होणारा आहे.विशेष म्हणजे या घनवन प्रकल्पाची तीन वर्षे जोपासना कॅच फाउंडेशन करणार



आहे.शहरात 2 लाख वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून आता पर्यंत 50 हजार वृक्ष लागवड करण्यात आली असून,शहरात लवकरच बांबू लागवड प्रकल्प उभा केला जाणार आहे असे शेवटी आयुक्त अजय वैद्य यांनी सांगितले. या प्रसंगी कॅच फाउंडेशनचे भरत सिसोदिया,अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त शैलेश दोंदे,रोहिदास दोरकुळकर,प्रा.डॉ.दिलीप काकविपुरे,उद्यान अधीक्षक निलेश संखे, कॅच फाउंडेशन व हफेले इंडिया प्रा लि.चे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई उपनगरी रेल्वेची शंभरी!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महामुंबईच्या जडणघडणीत मोलाचे योगदान मुंबई उपनगरी रेल्वे अर्थात मुंबई लोकलचे आहे. पहिल्या विद्युत उपनगरी रेल्वेगाडीच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (तेव्हाचे व्हीटी) ते कुर्ला अशा १६ किलोमीटरच्या प्रवासाला येत्या आठवड्यात अर्थात ३ फेब्रुवारीला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. सध्या ३०० किलोमीटर असलेला उपनगरी रेल्वेचा पल्ला शतकोत्तरात ४०० किलोमीटर पार करण्याचे रेल्वे प्रशासनाचे नियोजन आहे.

३ फेब्रुवारी १९२५ या दिवशी कोळशाचे इंजिन सोडून मध्य रेल्वेच्या व्हिक्टोरिया टर्मिनस (आताचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते कुर्ला स्थानक या दरम्यान पहिली उपनगरी रेल्वे विजेवर धावली. वाफेवर चालणाऱ्या इंजिनपासून



१५०० व्होल्टेड डीसी प्रणालीवर धावणाऱ्या इंजिनचा चार डब्यांसह प्रवास सुरू झाला आणि भारतीय रेल्वेच्या विद्युतीकरणाला सुरुवात झाली. १९२८पर्यंत हार्बर मार्गावर चार डब्यांची लोकल आणि मुख्य मार्गावर आठ डब्यांची लोकल धावत होती. १९२५ ते २०२५ अशा लोकलच्या शंभर वर्षानिमित्त मुंबईत विविध कार्यक्रमांचे आयोजन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. भारतीय रेल्वेची पहिली विद्युत रेल्वेगाडी मध्य रेल्वेमार्गावर धावली. मुंबई लोकल सद्यस्थितीत ७७ लाखांहून अधिक प्रवाशांची रोज वाहतूक करत आहे. मुंबई उपनगरी रेल्वेवरील मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील सात मार्गांवरील एकूण ३०० किमी मार्गावर उपनगरी रेल्वे धावती आहे. चार डब्यांचा विस्तार १५ डब्यांपर्यंत करण्यात आला आहे. वातानुकूलित लोकलही धावती आहे. मुंबई लोकलचा विस्तार ४०० किमीपर्यंत करून येत्या पाच वर्षांत ३०० लोकल फेऱ्या वाढवण्याच्या नियोजनाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यानुसार नवीन उपनगरी रेल्वेमार्गाचे काम विविध टप्प्यांत सुरू आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. भारतीय रेल्वेने शून्य कार्बन उत्सर्जन ध्येय निश्चित केले आहे. रेल्वेचे विद्युतीकरण हा अभियांत्रिकी प्रगतीतील एक मोलाचा टप्पा आहे. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी रेल्वेचे विद्युतीकरण पूर्ण झाले. यात १५०० व्होल्ट डीसीचे २५,००० व्होल्ट एसी हा वीजबचतीचा अतिशय महत्त्वाचा टप्पा २०१५मध्येच पूर्ण करण्यात आला. रेल्वेने शून्य कार्बन उत्सर्जनाचे ध्येय निश्चित केले असून त्यानुसार विद्युतीकरणानंतर आता हायड्रोजन उर्जेवर धावणाऱ्या इंजिनाकडे पावले टाकण्यात येत आहेत.

# गीतासार



वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय
जीर्णान्यन्यानि संयाति
नवानि देही ॥२- २२॥

ज्याप्रमाणे माणूस जुनी वस्त्रे टाकून देऊन नवी वस्त्रे घेतो, त्याचप्रमाणे जीवात्मा जुनी शरीरे टाकून दुसऱ्या नव्या शरीरात जातो. ॥ २-२२ ॥

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति
पावकः ।न चैनं क्लेदयन्त्यापो न
शोषयति मारुतः ॥२- २३॥

या आत्म्याला शस्त्रे कापू शकत नाहीत, विस्तव जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही आणि वारा वाळवू शकत नाही. ॥ २-२३ ॥

अच्छेद्योऽयम दाह्योऽयम
क्लेद्योऽशोष्य एव च ।नित्यः
सर्वगतः स्थाणुरचलोऽयं
सनातनः ॥२- २४॥


कारण हा आत्मा कापता न येणारा, जाळता न येणारा, भिजवता न येणारा आणि निःसंशय वाळवता न येणारा आहे. तसेच हा आत्मा नित्य, सर्वव्यापी, अचल, स्थिर राहाणारा आणि सनातन आहे. ॥ २-२४ ॥

अव्यक्तोऽयम चिन्त्योऽयम
विकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं
नानुशोचितुमर्हसि ॥२- २५॥

हा आत्मा अव्यक्त आहे, अचिंत्य आहे, आणि विकाररहित आहे, असे म्हटले जाते. म्हणून हे अर्जुना, हा आत्मा वर सांगितल्याप्रमाणे आहे, हे लक्षात घेऊन तू शोक करणे योग्य नाही. ॥ २-२५ ॥

## आरोग्य टिप्स

### कणिक रेफ्रिजरेटर मध्ये ठेवताय ?



रेफ्रिजरेटेड कणकेपासून रोटी बनवण्याचा एक मोठा फायदा म्हणजे तो वेळ वाचवतो. जर तुम्ही काम करणारे असाल आणि दररोज पीठ मळण्यासाठी वेळ काढू शकत नसाल तर ही पद्धत तुमच्यासाठी सोयीस्कर ठरू शकते.

काही लोकांचा असा विश्वास आहे की हलक्या आंबलेल्या पिठापासून बनवलेली ब्रेड पचायला थोडी सोपी असू शकते, कारण आंबवण्याची प्रक्रिया पचन सुधारण्यास मदत करू शकते. पण हा फायदा तेव्हाच होतो जेव्हा पीठ जास्त काळ साठवले जात नाही आणि त्यात कोणतेही हानिकारक जीवाणू विकसित झाले नाहीत.

1.पोषक तत्वांचा नाश: रेफ्रिजरेटरमध्ये बराच काळ ठेवलेल्या पिठामध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजांचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे रोटीची पौष्टिक पातळी कमी होते.

२.चव आणि ताजेपणा कमी होणे: रेफ्रिजरेटरमध्ये साठवलेल्या पिठाची चव आंबट असू शकते आणि ताज्या पिठाच्या तुलनेत त्याला विचित्र वास येऊ शकतो. याचा पोळीच्या चवीवर परिणाम होतो.

३. बॅक्टेरिया आणि बुरशीचा धोका: जर पीठ जास्त काळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले तर त्यात बॅक्टेरिया आणि बुरशी विकसित होऊ शकतात, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात.

# माघी गणपती



माघ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या चतुर्थीला गणेश जयंती साजरी केली जाते. या तिथीला भगवान श्री गणेशाचा जन्म झाला. जाणून घेऊ या माघी गणेश जयंतीचे धार्मिक महत्त्व.

माघ शुद्ध चतुर्थीला भगवान श्री गणेशाचा जन्म झाला. हा दिवस गणेश जयंती किंवा माघ गणपती या नावाने साजरा केला जातो. भाद्रपद महिन्यातील गणेशोत्सवाप्रमाणेच माघी गणपतीत देखील श्री गणेशाची पूजा केली जाते. गणपतीने तीन अवतार घेतल्याचे सांगितले गेले आहे. या तीन अवतारांचे तीन जन्मदिन साजरे करण्याची प्रथा आहे. त्यांपैकी एक म्हणजे माघी गणपती.

गणपतीने कोणते तीन अवतार घेतले? गणपतीने एकूण तीन अवतार घेतल्याचे मानले गेले आहे. गणपतीने पहिला अवतार वैशाख पौर्णिमेच्या दिवशी घेतला. हा दिवस पुष्टिपती विनायक जयंती म्हणून साजरा केला जातो. तर, दुसरा अवतार हा भाद्रपद शुक्ल चतुर्थीला घेतला गेला. या दिवसाला श्रीगणेश चतुर्थी म्हणून पार्थिव गणेश पूजन करून साजरा केला जातो. तिसरा अवतार हा माघ शुक्ल चतुर्थीला घेतला. हा दिवस गणेश जयंती म्हणून साजरा केला जातो. गणेश जयंतीच्या दिवशी नक्तव्रताचे आचरण करून ढुंढिराजाचे पूजन केले जाते आणि तिळसाखरेचे किंवा तिळगुणाचे मोदक अर्पण केले जातात. त्याच प्रमाणे दिवसभर उपवास करून सूर्यास्तानंतर भोजन केले जाते. गणेशान नरांतक राक्षसाचा वध करण्यासाठी कश्यपाच्या कुटुंबात विनायक या नावाने अवतार घेतला म्हणून या चतुर्थीला विनायकी चतुर्थी असेही म्हटले जाते. या चतुर्थीला तिलकुंद चतुर्थी असेही म्हणतात. गणेश चतुर्थीच्या दिवशी पाण्यात तिळ घालून त्या पाण्याने स्नान केले जाते. तसेच उपवास देखील केला जातो. माघ महिन्यातील गणेश जयंतीला धातूत्या, पाषाणाच्या किंवा मातीच्या गणेशमूर्तीचे पूजन केले जाते. प्रथम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. तसेच आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, दीप, नैवेद्य, मंत्रपुष्प, प्रदक्षिणा आणि नमस्कार अशा एकूण १६ उपचारांनी श्रीगणेशाचे पूजन केले जाते. तसेच माघ महिन्यातील गणेशपूजनात पत्री अर्पण न करता दूर्वा अर्पण केल्या जातात. त्याच प्रमाणे पुराणाच्या मोदकाऐवजी तिळसाखरेच्या मोदकाचा प्रसाद अर्पण केला जातो. या पूजेसाठी गणेशमूर्ती लहान असावी असे सांगितले गेले आहे. विशेष म्हणजे या गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी उत्तरपूजा करून या मूर्तीमधील देवत्व काढून घेतले जाते. त्यानंतर मूर्तीचे विसर्जन केले जाते.

माघी गणेश जयंती आणि गणेश जयंतीमध्ये फरक : गणेश जयंतीचा मुख्य उत्सव आषाढ महिन्याच्या शुद्ध चतुर्थीला साजरा केला जातो, जो साधारणतः आषाढ शुद्ध चतुर्थीला येतो. ह्या दिवशी गणेशाची स्थापना केली जाते आणि 10 दिवसांच्या उत्सवाचा प्रारंभ होतो. हा मोठा उत्सव असतो जो दिवसभर भक्तगणांमध्ये आनंदाने साजरा केला जातो. तर, माघी गणेश जयंती माघ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या चतुर्थीला येते. ह्या दिवशी विशेष पूजा केली जाते, पण 10 दिवसीय उत्सव नाही. माघी गणेश जयंतीवर साधारणतः गणेशाचे पूजन विशेष महत्वाचे मानले जाते. यामध्ये प्रमुख पूजेच्या विधींचा समावेश होतो, पण मोठ्या मापावर मूर्ती स्थापना आणि विसर्जन नाही.

## कल्याणच्या शिवप्रेमी माघी गणेशोत्सवात यंदा तिरुपती बालाजी मंदिराचा देखावा

### आमदार विश्वनाथ भोईर यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या मंडळाचे ३१ वे वर्ष



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील सर्वात जुना सार्वजनिक माघी गणेशोत्सव अशी ओळख असलेल्या उंबर्डे येथील शिवप्रेमी माघी गणेशोत्सवामध्ये यंदा दक्षिणेतील श्री तिरुपती बालाजी मंदिराचा भव्य देखावा साकारण्यात येणार आहे. कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या पुढाकाराने गेल्या 30 वर्षांपासून हा माघी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या स्वरूपात तो साजरा करण्यात येणार आहे.

दिवंगत शिवसेना ठाणे जिल्हाप्रमूख आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या उंबर्डे कोळिवली उपविभागीय शाखेतर्फे गेल्या 3 दशकांपासून हा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. गेल्यावर्षी याठिकाणी साकारण्यात आलेल्या अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराची हुबेहूब प्रतिकृती पाहण्यासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली होती. केवळ कल्याण आणि आजूबाजूच्या परिसरातीलच भाविक नव्हे तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून हजारो भाविक याठिकाणी दर्शनासाठी येत असतात. यंदा लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या दक्षिण भारतातील श्री तिरुपती बालाजीच्या मंदिराचा भव्य देखावा उभारण्यात आला असल्याची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी जयवंत भोईर यांनी दिली. येथील स्व. आत्माराम भोईर चौकात तब्बल 70 फूट उंच आणि 60 फूट लांबीच्या आकाराचे तिरुपती बालाजी मंदिर याठिकाणी साकारण्यात आले असून गेल्या महिन्याभरापासून दिवस रात्र त्याचे काम सुरू होते. त्यासोबतच स्व. व्ही.बी.भोईर चौक ते आत्माराम भोईर चौकापर्यंत सुंदर अशी विद्युत रोषणाई करण्यासह वेगवेगळे देखावेही उभारण्यात आले आहेत.

याठिकाणी उद्या विराजमान होणाऱ्या गणपती बाप्पांच्या दर्शनासाठी आणि सुंदर देखावा पाहण्यासाठी लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार विश्वनाथ भोईर, जयवंत भोईर, प्रभूनाथ भोईर, गणेशोस्तव समितीचे अध्यक्ष भरत भोईर यांच्यासह संपूर्ण आयोजन समितीतर्फे करण्यात आले आहे.

## गणेश तांबे यांच्या वतीने सायबर गुन्हे निर्मूलन शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सध्या भारत देशाला सायबर गुन्हेगारीने वेढले आहे. त्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि पोलीस आयुक्त आशुतोषजी डुंबरे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली शहरी भागात शिबीर घेतली जात आहेत. त्याप्रमाणे मुख्यतः ग्रामीण भागात अश्या सायबर गुन्हेगारीविरुद्ध ज्ञान मिळून कायदेशीर मदत कशी मिळू शकेल यासाठी शिवसेना उपविभागप्रमुख तथा सामाजिक कार्यकर्ते गणेश संपत तांबे यांनी 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा गोळेगाव, जुन्नर, पुणे येथील ग्रामीण भागात जनजागृती व्हावी म्हणून सायबर गुन्हे निर्मूलन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भूमीकन्या निशा फुलसुंदर यांचा विशेष सन्मान करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना शालेय वस्तू आणि खाऊ वाटप करण्यात आले.

यावेळी सायबर तज्ञ प्रणय कदम, पोलीस निरीक्षक किरण अवसर, मुख्याध्यापक मोहन नाडेकर, गिरीजा ग्रामीण पतसंस्था अध्यक्ष राजेश बिडवई, पोलीस पाटील कविता बिडवई, गिरीजा ग्रामीण पतसंस्था उपाध्यक्ष भारत शेट्ये, मा.सरपंच गणेश लोखंडे, ग्रा.पं.सदस्य अरविंद बिडवई, व्य.समिती सदस्य मोहन लोखंडे, शाळा व्य.समिती सदस्य सुप्रिया बिडवई, ग्रा.पं.सदस्य अर्चना ताम्हाणे, गुलाबताई लोखंडे, माजी सैनिक सुभाष बिडवई, जालिंदर माळी,आशा सेविका छाया ढेकणे, लेण्याद्री देवस्थान विश्वस्त सदाशिव तांम्हाणे उपस्थित होते.

## केडीएमटीची रुणवाल गार्डन व माय सीटी परिवहन सेवा सुरु



कल्याण ग्रामीणचे आ. राजेश मोरे यांचा बसप्रवास

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : समान्य जनतेशी नाळ जोडलेला एक कार्यकर्ता म्हणजेच आमदार राजेश मोरे अशी ओळख असलेले कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे शिवसेना आमदार राजेश मोरे, तालुकाप्रमुख महेश पाटील, विकी हिंगे, लक्ष्मण मिसाळ, शिवसैनिक व नागरिकांसह परिवहन बसमधून रुग्णवाल माय सिटी ते डोंबिवली स्टेशन असा प्रवास केला.

डोंबिवली पूर्वेकडील रुणवाल गार्डन, माय सीटी येथे कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवा अंतर्गत बस सेवा सुरू करा अशी मागणी रुणवाल गार्डन वसाहतीतील नागरिकांनी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघांचे शिवसेना आमदार राजेश मोरे यांच्याकडे केली होती. शुक्रवार ३१ जानेवारी पासून रूणवाल गार्डन व माय सीटी ते डोंबिवली अशी बस सेवा सुरू करण्यात आली. यावेळी कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे, शिवसेना कल्याण तालुका प्रमुख महेश पाटील, दत्ता वझे, दिनेश शिवलकर, विकी हिंगे, अवनी शर्मा, परिवहन उपक्रमाचे मार्ग तपासणीस शालिक टावरे, राजेंद्र पातकर आदींनी श्रीफळ वाढवून बस सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेमुळे हजारो नागरिकांना या सुविधेचा फायदा होणार आहे. अनेक दिवसांची ही मागणी पूर्ण झाल्याने जेष्ठ नागरिक व महिलांनी आमदार राजेश मोरे यांचे आभार व्यक्त केले.

## दहागावमध्ये मोराचा संशयित मृत्यू

### वनविभागाकडून अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील दहागाव जंगल परिसरात एका मोराचा संशयास्पद मृत्यू झाल्याने वन्यजीव प्रेमी आणि स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दहागाव जंगलातील सर्व्हे नंबर ६ मध्ये हा मृत मोर आढळून आला. वनकमिटीचे सदस्य गोरक्ष बांधणे यांना याची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पाहणी दरम्यान मृत मोर या ठिकाणी आढळून आला तसेच जंगलात तारेचे सहा ते सात शिकारीचे फासही सापडले. यावरून जंगलात बेकायदेशीर शिकार सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

याबाबतची माहिती वनविभागाला कळविण्यात आली, त्यानंतर वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी पंचनामा करून मृत मोर ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी संजय चन्ने यांनी या घटनेची दखल घेत अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले आहे. तसेच संदर्भीत परिसरात वन विभागाने गस्त देखील वाढविली असल्याचे सांगितले.

## प्लास्टिक साठ्यावर केडीएमसीची कारवाई

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अधिकाऱी वर्गानी क प्रभाग परिसरातील दुकानांची पाहणी केली असता, या पाहणी दरम्यान किरण स्टोअर या होलसेल दुकानात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक साठा आढळून आला. दुकानात सुमारे 120 किलो प्रतिबंधित प्लास्टिक आढळल्याने संबंधित दुकानदारावर रुपये 25 हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे. महापालिकेने यापूर्वीही अशी कारवाई करून मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित प्लास्टिक जप्त केले आहे. हि कारवाई महापालिका परिमंडळ-1 चे उपआयुक्त प्रसाद बोरकर यांचे मार्गदर्शनाखाली क प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात, अधिक्षक उमेश यमगर, स्वच्छता निरीक्षक जगन्नाथ वड्डे यांच्या पथकाने केली. महापालिकेकडून प्रतिबंधित प्लास्टिक बंदीच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने उपाययोजना राबविण्यात येत असून, अनधिकृतरित्या प्लास्टिक साठवणाऱ्या व विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## डोंबिवलीतील बाळाचा जीवरक्षक भावेशचा युवासेनेकडून सत्कार




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून पडत असलेल्या दोन वर्षाच्या बाळाला झेलून त्याचा जीव वाचविणारा भावेश एकनाथ म्हात्रे हा देवदूत ठरला. भावेशच्या या धाडसाला सलाम करत युवा सेना कल्याण जजिल्हा अध्यक्ष जितेन पाटील यांच्यासह युवासेना जिल्हा सचिव राहुल श्रीधर म्हात्रे, शहर अध्यक्ष सागर जेधे, विधानसभा अध्यक्ष सागर दुबे, उपशहर अध्यक्ष अनमोल म्हात्रे, शहर समन्वयक दिलीप सामंत, विभाग प्रमुख संदेश पाटील, शाखा प्रमुख अंकित जाधव, चिरायू पारदुले तसेच सामाजिक कार्यकर्ते .युवासेना जिल्हा सचिव राहुल श्रीधर म्हात्रे, शहर अध्यक्ष सागर जेधे, विधानसभा अध्यक्ष सागर दुबे, उपशहर अध्यक्ष अनमोल म्हात्रे, शहर समन्वयक दिलीप सामंत, विभाग प्रमुख संदेश पाटील, शाखा प्रमुख अंकित जाधव, चिरायू पारदुले यांनी भावेशला हनुमानाची मूर्ती देऊन सत्कार केला.यावेळी भावेशचे वडील एकनाथ म्हात्रे व भाऊ पमेश म्हात्रे उपस्थित होते.

## परिवहन विभागाच्या दुर्लक्षामुळे ट्रॅक्टर ठरताहेत यमदूत

### मुरबाड तालुक्यात ना ट्रॅक्टरला सिग्नल ना ट्रॅक्टरला प्लेट नंबर!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्याचे शेतीचे काम करण्यासाठी असणारे अनेक ट्रॅक्टर परिवहन खात्याने केलेल्या दुर्लक्ष यामुळे हे ट्रॅक्टर इतर वाहनांच्या लोकांचे जीव घेत आहेत अनेक ट्रॅक्टरांवरती कोणत्याही प्रकारचे नंबर प्लेट सुद्धा नाहीत तसेच इंडिकेटर्स हेडलाइट्स हे देखील नाहीत अनेक ट्रॅक्टर नादुरुस्त असताना देखील त्यावर अल्पवयीन वाहन चालक तसेच बिना परवाना वाहन चालक ट्रॅक्टर चालवीत आहेत हे ट्रॅक्टर पोलिसांच्या व परिवहन खात्याच्या नजरेतून वाचत आहेत सदर अनेक ठिकाणी हे ट्रॅक्टर शेतीमध्येच असतात व ग्रामीण भागातून या गावातून त्या गावात जात असताना ते थोड्या वेळासाठी जरी मुख्य रस्त्यावर आले तर त्यांचा चालवण्याचा वेग मर्यादा नसते कुठल्याही प्रकारचे स्टॉप लाईट पार्किंग लाईट दिशादर्शक नसल्याने इतर वाहन त्यांना धडकतात असाच प्रकार मुरबाड तालुक्यातील... वडवली गावातील नयन चंद्रकांत शिंगोळे (वय २४) हा संध्याकाळी आपला काम वाटून मुरबाड वरून सरलगाव कडे येत असताना मध्येच मोहप गावच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर थांबलेल्या ट्रॅक्टरच्या अपघातात नयनचा मृत्यू झाला,, ही घटना गेल्या आठवड्यात घडली आहे. जर कदाचित ट्रॅक्टरला पाठीमागे सिग्नल असतात तर कदाचित नयन शिंगोळे वाचू असता,,, त्यामुळे तालुक्यात सर्वच ट्रॅक्टरला पाठीमागे सिंगल नसल्याने आज पर्यंत ट्रॅक्टर अपघातामुळे बरेच तरुण तसेच वयोवृद्ध माणसे बळी पडली आहेत. सदर घटना अतिशय दुर्दैवी आहे अशा ट्रॅक्टर मुळे मोठ्या प्रमाणात दुर्घटना होऊन लोकांचा जीव जात आहे कमी पगारामध्ये वाहन नियमात चालवत नसणाऱ्या वाहन चालकाला ट्रॅक्टर वरती बसवतात व अनेक किलोमीटर वरून मालकाच्या मोटरसायकल वरती अथवा कार मध्ये डिझेल इंधन नेऊन शेतावरच ट्रॅक्टर मध्ये टाकून चालवत असतात त्यामुळे हे ट्रॅक्टर मुख्य रस्त्यावरती पोलिस व परिवहन खात्याच्या नजरेत येत नाहीत त्यामुळे कधीकाळी अचानक हे ट्रॅक्टर मुख्य रस्त्यावर आले की कोणाचा तरी जीव घेतल्याशिवाय ते जात नाहीत वाहन परिवहन कायद्यानुसार असे भरमसाठ ट्रॅक्टर आहेत की ते कोणत्याही कायद्यात बसत नाहीत तरी यांच्यावरती अंकुश ठेवण्यासाठी परिवहन खाते व पोलीस यांनी प्रत्येक गावातील ट्रॅक्टरचा सर्वे करून सदर ट्रॅक्टर मालक व चालक यांचे परवाने पारदर्शक तपासून पाहावे तसेच ज्या ट्रॅक्टरांना सिंगल नाही, तसेच नंबर प्लेट नाही अशा ट्रॅक्टरवर त्वरित कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# कॉरीडॉरच्या विकासातील अडथळे दूर करण्याचे सिडको समोर आव्हान

## कॉरीडॉर उभारणीकडे दुर्लक्षामुळे गाळेधारकांचे अतिक्रमण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : सिडको महामंडळाने हजारो कोटी रुपये खर्च करुन खारघर उपनगराचे निर्माण केले. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून उपनगरातील पांडव मार्गावरील मुख्य सेवा कॉरीडॉर बांधण्याकडे दुर्लक्ष केल्याने या जागेवर गाळेधारकांनी अतिक्रमण केले. तसेच पनवेल पालिकेनेसुद्धा याच मोकळ्या जागेवर फलक उभारणीचे काम एका कंत्राटदाराला दिले. सध्या या सेवा कॉरीडॉरच्या विकासातील अडथळे दूर करणे हेच सिडको मंडळासमोर आव्हान बनले आहे.

अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणाऱ्या सिडकोला खारघरमध्ये शिरुन ही जागा मोकळी केल्याशिवाय खारघरवासियांना हा सेवा कॉरीडॉर मिळू शकणार अशी स्थिती निर्माण झाली आहे. खारघर उपनगरातील सेंट्रल पार्क येथील ग्रामविकास भवनाची इमारत ते उत्सव चौक या दरम्यान मोकळ्या जागेवर सिडकोच्या नियोजन आराखडाप्रमाणे १३ मीटर रुंदीचा



**पनवेल पालिकेने जाहिरात फलके लावण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर संबंधित कंत्राटदाराने संबंधित कोरीडॉरच्या जागेवर सिडकोची परवानगी न घेता जाहिरात फलक उभारले. यासंदर्भात पनवेल मनपाला ते फलक निष्कासित करण्याबद्दल ८ मार्च २०२३ ला पत्राने कळविले. परंतु पनवेल पालिकेने ही कारवाई न केल्यामुळे १३ एप्रिल २०२३ ला सिडकोच्या बांधकाम नियंत्रण विभागाला योग्य ती कारवाई करण्याचे सूचविले. अद्याप सिडकोच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केलेली नाही. याबाबत सिडकोचे जनसंपर्क विभागाशी संपर्क होऊ शकला नाही. तसेच पनवेल पालिकेचे उपायुक्त प्रेसनजीत कार्लेकर यांनी माहिती घेऊन नंतर प्रतिक्रिया देऊ असे सांगितले.**

जागा सेवा कॉरीडॉरसाठी प्रस्तावित आहे. मुख्य रस्त्यालगत ८ मीटर रुंदीचा सेवा रस्ता, पदपथ आणि वाहनतळासाठी या जागेचा लाभ वाहनचालकांना होऊ शकणार आहे. सध्या ग्रामविकास भवन ते उत्सव चौक या दरम्यानचे गाळेधारक आणि गृहनिर्माण सोसायटी आणि फलकांमुळे येथे सेवा कॉरीडॉरचे काम सुरू करणे सिडकोला शक्य नसल्याचे सिडकोच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर सांगितले.

सिडको मंडळाकडून अद्याप या जागेचे हस्तांतरण झाले नसताना पनवेल महापालिकेने संबंधित जागेवर फलक उभारणीसाठी कंत्राटदाराची नेमणूक करुन पालिकेचे उत्पन्न सुरू केले. खारघर युटीलिटी कॉरीडॉर हा पनवेल महानगरपलिका हद्दीतील व सिडकोच्या मालकीचा आहे. ६ सप्टेंबर २०२३ मध्ये सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय क्र. १२७६४ संबंधित जागेवरील जाहिरात फलकास परवानगी अथवा न हरकत देण्यास व्यवस्थापक (शहरसेवा-३) यांची नियुक्ती करण्यात आली. २३ डिसेंबरला सिडकोचे व्यवस्थापक (शहरसेवा-३) यांच्या निर्देशानंतर खारघर सेवा कॉरीडॉरवर असलेल्या जाहिरात होर्डीगच्या सर्वेक्षणकरिता समिती स्थापन करण्यात आली. दुसऱ्याच दिवशी या समितीने संबंधित जागेवर सर्वेक्षण केले. यावेळी सिडकोच्या परिवहन व दूरसंचार विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी जाहिरात फलकांना परिवहन विभागामार्फत कोणतीही परवानगी देण्यात आली नसल्याचे समितीने स्पष्ट केले.

# पालघर जिल्हा परिषदेच्या सांस्कृतिक कार्यक्रम थांबवण्याचा प्रयत्न

## पोलिस - आणि शासकीय अधिकाऱ्यांमध्ये वाद



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : जिल्हा परिषदे तर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सरस कार्यक्रमाच्या व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मध्यरात्रीनंतर ध्वनीक्षेपक मोठ्या आवाजात सुरू असल्याने कार्यक्रम थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांसोबत जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी व सदस्यांसोबत वाद झाला.

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवार (३० जानेवारी) रोजी सायंकाळी सहा वाजता सुरू होणार होते. मात्र प्रत्यक्षात हे कार्यक्रम सुरू होण्यास रात्रीचे ७३०-८ वाजले. जिल्हा परिषदेचे बहुतांश अधिकारी व कर्मचारी रात्री ११ वाजेपर्यंत आपापल्या घरी परतले. जिल्हा परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाळ १७ फेब्रुवारी रोजी संपत असल्याने अखेरच्या सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक सदस्य व पदाधिकारी नृत्य व मनोरंजन करण्यात गुंग होते.

हा कार्यक्रम पालघर पोलीस स्टेशन जवळ असल्याने रात्री एक वाजल्याच्या सुमारास एक पोलीस उपनिरीक्षक व त्यांचे सहकारी कार्यक्रम स्थळी गेले. सुरू असलेल्या कार्यक्रमातील आवाजाची ध्वनिफीत काढून त्यांनी ध्वनीक्षेपक यंत्रचालकाला आवाज बंद करण्याच्या सूचना दिल्या.

> **संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी आपण कोणतेही गैरकृत्य केल्या नसल्यावर अखेर पर्यंत ठाम राहिले. त्यानंतर हा कार्यक्रम बंद करून जिल्हा परिषद सदस्य वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे दाद मागण्यासाठी गेले असल्याची माहिती पुढे आली आहे. पालघर पोलीस ठाण्याच्या स्टेशन डायरीमध्ये या घटनेची नोंद करण्यात आली असून दोन्ही बाजूमध्ये निर्माण झालेले गैरसमज दूर झाले आहेत.**
> **- अनंत पराड**
> **प्रभारी अधिकारी**

पोलिसी खक्यात हे संभाषण झाल्याने मौजमजा करण्याच्या धुंदीत असणाऱ्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व पदाधिकारी दुखावले गेले. हा कार्यक्रम कोणाचा आहे, आम्ही कोण आहोत अशा स्वरूपात कार्यक्रम स्थळी उपस्थित असणाऱ्या काही जिल्हा परिषद सदस्यांनी तत्सम पोलिसांकडे विचारणा केली. त्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष व सदस्य यांनी पोलिस कर्मचाऱ्यांच्या उर्मट वर्तनाबाबत आक्षेप नोंदवला. मात्र आपण कायद्याचे पालन करत असल्यावर पोलीस कर्मचारी ठाम राहिल्याने उभयतांमध्ये सुमारे २० मिनिटं जोरदार वादंग पेटला



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पनवेलमध्ये विकासकामांचे लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल : नवीन पनवेल येतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे सीझन क्रिकेट मैदान आणि महापालिकेने विकसित केलेल्या लोकाभिमुख ॲप सेवेसह अनेक विकासकामांचे लोकार्पण सोहळा पुढील आठवड्यात पनवेलमध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडणार आहे. पनवेल पालिकेत याची लगबग सुरू असून विकासकामांचा होणाऱ्या सोहळयात हे मैदान दिलीप वेंगसरकर यांच्या अकादमीला हस्तांतरित केले जाईल. पुढील १९ वर्षांसाठी वेंगसरकर यांच्या अकादमीला या मैदानाचा कारभार या निमित्ताने सोपविला जाणार आहे. प्रशिक्षणाची सुरुवात झाल्यावर काही महिन्यांनी हे क्रिकेट मैदान पनवेलची ओळख बनेल. या मैदानावर आंतरराष्ट्रीय सीझन क्रिकेट प्रशिक्षणाचे धडे मुलांना दिले

> ॲपचे लोकार्पण
> मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पालिकेने नवीन विकसित केलेल्या एका ॲपचे लोकार्पण होणार असून नागरिकांना या एका ॲपमधून अनेक पालिकेच्या सेवा घरबसल्या हाताळता येणार आहेत. या सेवा अशा – तक्रार करणे व त्यावर पालिकेने केलेली कार्यवाहीची दखल, मालमत्ता कराचा भरणा, महिला व जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षेच्या सुविधा, गुलाबी रिक्षाच्या माध्यमातून पनवेलमधील महिलांना उद्योगाची संधी.

सद्यस्थितीतील आढावा घेण्याचे काम पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडून सुरू आहे.

नवीन पनवेल उपनगरात सेक्टर ११ येथील ३० हजार चौरस मीटर क्षेत्रावर ९ कोटी रुपये खर्च पनवेल महापालिकेने सीझन क्रिकेट अकादमी उभारली आहे. या अकादमीच्या मैदानावर दहा वेगवेगळया आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पीच तयार केले आहेत. सीझनचा चेंडू ठरावीक उंचीपर्यंत या पीचवर उडेल अशी आखणी पालिकेने केली आहे. पुढील आठवड्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत जातील. पालिका क्षेत्रातील ५०, रायगड जिल्हा व राज्यातील प्रत्येकी २५ अशा शंभर विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी क्रिकेटचे मोफत प्रशिक्षण येथून घेता येईल.

पनवेलमधील पालिकेच्या दि. बा. पाटील विद्यासंकुलामध्ये पालिकेने स्मरणिकेचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते केले जाईल. पालिकेने शहर स्वच्छतेसाठी कोट्यावधी रुपयांची विविध वाहने खरेदी केली आहेत. त्यांचे सुद्धा लोकार्पण या कार्यक्रमात केले जाईल. तारांगण यासारख्या प्रकल्पाचे सुद्धा लोकार्पण केले जाईल.

# वसई विरार स्थानकांतील वाढती गर्दी प्रवाशांच्या जीवावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : पश्चिम रेल्वेवरील वसई, नालासोपारा, मिरा रोड ही रेल्वे सर्वात गर्दीची स्थानके बनत चालली असून येथे अपघाती मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे. २०२४ या वर्षात वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल २२७ प्रवाशांचा अपघाती मृत्यू झाला आहे. त्यापैकी रुळ ओलांडताना १२८ जणांचा तर गर्दीमुळे ट्रेन मधून ५० जणांचा मृत्यू झाला आहे.

पश्चिमे रेल्वेची वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या अखत्यारित मिरा रोड, भाईंदर, नायगाव, वसई, नालासोपारा, विरार आणि वैतरणा अशा रेल्वे स्थानकांचा समावेश होतो. वसई विरार मध्ये लोकसंख्या वाढत असल्याने प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे.

> **रुळ ओलांडताना वाढते मृत्यू**
> वसई आणि पालघर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेल्वे रुळ ओलांडना मृत्यू वाढत आहे. २०२४ या वर्षात २०४ प्रवाशांचा रेल्वे रूळ ओलांडताना मृत्यू झाला. त्यात वसईच्या हद्दीत १२८ तर पालघरच्या हद्दीत ७६ जणांचा मृत्यू झाला.मागील आठवड्यात पालघर रेल्वे स्थानकात वैष्णवी रावल (१६) या विद्यार्थिनीचा रेल्वे रुळ ओलांडताना मृत्यू झाला होता.

दररोज लाखो प्रवासी पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय लोकल ट्रेन मधून मुंबईच्या दिशेने प्रवास करत असतात. त्यामुळे मिरा रोड, भाईंदर, नालासोपारा, विरार



ही स्थानके प्रचंड गर्दीची ठरू लागली आहेत. विरार बोरीवली दरम्यान चार मार्गिका तयार करण्यात आली असून लोकल ट्रेन गाड्यांची संख्या देखील वाढविण्यात आली आहे. मात्र सकाळी आणि संध्याकाळी प्रचंड गर्दी असल्याने प्रवाशांना जीव धोक्यात घालून ट्रेनमधून लटकून प्रवास करावा लागत आहे. परिणामी ट्रेन मधून खाली पडून प्रवाशांना जीव गमवावा लागत आहे. २०२४ या वर्षात वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५० प्रवाशांचा तर पालघरच्या हद्दीत २३ जणांचा ट्रेनमधून खाली पडून मृत्यू झाला होता. पालघर आणि वसईत एकूण ८३ प्रवाशांचा धावत्या ट्रेनमधून खाली पडून मृत्यू झाला होता. त्यात १० महिला आणि ६३ पुरूष प्रवाशांचा समावेश आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेने दिली.

# कल्याण डोंबिवली मनपाच्या अ प्रभाग साहाय्यक साहाय्यक आयुक्तपदी प्रमोद पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या टिटवाळा परिसर अ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त पदावरून संदीप रोकडे यांना तडकाफडकी हटवून या पदावर आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी प्रमोद पाटील यांची गुरुवारी नियुक्ती केली. पाटील यांना तात्काळ या पदाचा पदभार स्वीकारण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. प्रमोद पाटील ब प्रभागात अधीक्षक पदावर कार्यरत होते. यापूर्वी त्यांनी साहाय्यक आयुक्त म्हणून डोंबिवली ह प्रभागात काम केले आहे. खमस्या, कठोर शिस्तीचा अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. ह प्रभागात असताना त्यांनी राजकीय दबाव झुगारून बेकायदा बांधकामांच्या विरुध्द जोरदार मोहीम सुरू केली होती.

टिटवाळा, बल्याणी परिसरात बेसुमार बेकायदा बांधकामे सुरू असल्याच्या तक्रारी आयुक्तांकडे अधिक प्रमाणात येत होत्या. यापूर्वी आयुक्तांनी अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त रोकडे यांना बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. तेवढ्यापुरतीच त्यांच्याकडून कारवाई केली जात होती.

पालिकेतील दोन उपायुक्तांच्या शिफारशीवरून आयुक्तांनी रोकडे यांना अ प्रभागाचा साहाय्यक आयुक्त पदाचा पदभार गेल्या वर्षी दिला होता. रोकडे यांनी बेकायदा बांधकामांवर कारवाई करावी म्हणून दोन्ही उपायुक्तांनी वेळोवेळी रोकडे यांना तंबी दिली होती. तरीही त्यांच्या कार्यपध्दतीत सुधारणा होत नव्हती. आयुक्तांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे सूचित केले होते. ह प्रभागात असताना रोकडे बेकायदा बांधकामांच्या विषयावरून वादग्रस्त ठरले होते. पालिकेच्या सेवेतील शासन मान्यता साहाय्यक आयुक्त रोकडे आहेत.

दोन आठवड्यापासून आयुक्तांनी संदीप रोकडेंच्या जागी नवीन आयुक्त नेमण्याची कार्यवाही सुरू केली होती. बेकायदा बांधकामांचे आगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टिटवाळ्यात खमक्या साहाय्यक आयुक्ताची गरज होती. पाटील ती जबाबदारी पार पाडतील याची खात्री पटल्यावर आयुक्तांनी त्यांची तात्काळ अ प्रभाग साहाय्यक आयुक्त पदी नियुक्ती केली आहे. डोंबिवली पश्चिमेत ह प्रभाग क्षेत्रात खमक्या साहाय्यक आयुक्त नियुक्तीसाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे समजते. यासंदर्भात स्थानिक आमदार रवींद्र चव्हाण यांनी प्रभागांमध्ये कर्तव्यदक्ष नेमण्याची सूचना पालिका प्रशासनाला केली आहे.

# देवनार कचराभूमी परिसरातील ३९ खांबांची चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईः महानगरपालिकेकडून देवनार कचराभूमी परिसरात बसविलेल्या ३९ दिव्याच्या खांब्याची आज्ञात व्यक्तीने चोरी केली. ही बाब लक्षात आल्यानंतर कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. मुंबई शहरातील सर्वात मोठी कचराभूमी म्हणून देवनार कचराभूमी ओळखली जाते. गोवंडीच्या शिवाजी नगर परिसरात ही कचराभूमी आहे. गेल्या काही वर्षांत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आगीच्या घटना घडल्या होत्या. रात्रीच्या वेळी कचराभूमीतील कचऱ्याला आग लावण्यात येत असल्याचा पालिकेला संशय होता. त्यामुळे पालिकेने काही वर्षांपूर्वी संपूर्ण कचराभूमी परिसरात सौर ऊर्जेवर आधारित दिवे बसविले होते. या परिसरात एकूण २१० दिव्याचे खांब आहेत. मात्र गेल्या काही महिन्यात यापैकी ३९ दिव्यांचे खांब अज्ञात चोरांनी चोरल्याचे निदर्शनास आले आहे. तर काही ठिकाणी त्याची बॅटरीही चोरण्यात आली आहे.

# निवडणुका लांबल्याने इच्छुकांच्या डोळ्यांना अंधारी



**निवडणुकांबाबतची सुनावणी आता २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे त्या तारखेला निकाल लागला तरी निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी पुरेसा कालावधी नसेल. परिणामी निवडणुका पावसाळ्यानंतर ऑक्टोबर – नोव्हेंबर महिन्यातच होतील अशी शक्यता आहे. या बातमीने अनेकांच्या पोटात गोळा आला आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : गेल्या पाच वर्षांपासून कोणत्याही अधिकृत लोकप्रतिनिधीत्वाशिवाय असलेल्या मोठ्या राजकीय व्यक्ती, माजी नगरसेवक आणि इच्छुकांची दुसरी नगरसेवक पदाची टर्मही वाया जाते की काय असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. रखडलेल्या नगरपालिकांमध्ये कुळगाव बदलापूर, अंबरनाथ नगरपालिकांचा समावेश आहे. येत्या काही दिवसात या दोन पालिकांमध्ये नगरसेवक नसल्याच्या कार्यकाळाला पाच वर्ष पूर्ण होतील. जनसंपर्क टिकवून ठेवण्यासाठी झालेला खर्च आणखी किती काळ करायचा या विचाराने अनेकांच्या पोटात गोळा आला आहे.

जगावर आलेले करोनाचे संकट आणि अंबरनाथ तसेच बदलापूर शहराच्या पालिकांचा कार्यकाळ संपण्याचा कालावधी एकच होता. करोनाच्या संकटात लागलेली टाळेबंदी तोंडावर आलेल्या निवडणुकांवर विरजण पाडून गेली. २०२० वर्षात एप्रिल महिन्यात अंबरनाथ आणि बदलापूर या दोन्ही शहरांच्या निवडणुका होणे अपेक्षित होते. राज्यातील त्या काळात कार्यकाळ संपलेल्या आणि प्रशासकीय राजवट अनुभवणाऱ्या या दोन नगरपालिका होत्या. या प्रशासकीय राजवटीला आता लवकरच पाच वर्ष पूर्ण होणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली निवडणुकांबाबतची सुनावणी आता २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे त्या तारखेला निकाल लागला तरी निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी पुरेसा कालावधी नसेल. परिणामी निवडणुका पावसाळ्यानंतर ऑक्टोबर – नोव्हेंबर महिन्यातच होतील अशी शक्यता आहे. या बातमीने अनेकांच्या पोटात गोळा आला आहे. गेल्या पाच वर्षांपासून बांधणी केलेल्या प्रभागात जनसंपर्क टिकवण्यासाठी प्रत्येक सण उत्सवाला पैसे खर्च करावे लागतात. मात्र या सर्व इच्छुक आणि माजी नगरसेवकांची चक्क एक टर्म अर्थात पाच वर्षे वाया गेली आहेत. जर निवडणुकांचा निकाल लवकरच लागला नाही तर दुसरी टर्मही वाया जाते की काय असा प्रश्न उभा झाला असून या इच्छुकांच्या डोळ्यांना अंधारी आली आहे.

सध्या अंबरनाथ आणि बदलापूर शहरात हळदी कुंकू आणि इतर कार्यक्रमांच्या माध्यमातून मतदारांवर बक्षिसांची, भेटवस्तूंची लयलूट सुरू आहे. मात्र हे आणखी किती काळ करायचे हा प्रश्न त्यांच्यापुढे उभा आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांचे गणित कोलमडले आहे. सत्ताधारी पक्षातील वरिष्ठ माजी नगरसेवक विकासकामांच्या माध्यमातून आर्थिक गणित जुळवत आहेत. मात्र इतरांची आर्थिक कोंडी होत असल्याचे चित्र आहे.

निवडणुका कधी होतील याची धड तारीखही सांगता येत नाही. त्यात प्रभागा-प्रभागांत सोसायट्यांमधले नागरिक इच्छुक उमेदवारांकडे कामांची यादीच नेत आहेत. निवडणुकांपूर्वी स्थानिक नगरसेवक व इच्छुक लोकप्रतिनधी शहरांमध्ये सढळ हस्ते पैसा खर्च करत असतात. मात्र, गेल्या पाच वर्षांपासून निवडणुका कधीही होतील हीच शक्यता असल्याने सोसायट्यांनी आपल्या मागण्या थांबवलेल्या नाहीत. आपल्या सोसायट्यांची टाकी साफ करणे, गेट बसवणे, सोसायट्यांच्या पूजांना वर्गणी मागणे, टँकरद्वारे पाणी टाकून घेणे असले प्रकार शहरात होत आहेत.

जिल्हा परिषद ठाणे
आरोग्य विभाग
कार्यालयाचा पत्ता- जीएसटी भवन समोर, टोयोटा शोरूम जवळ,
रोड न.२२ वागळे इस्टेट सर्कल, ठाणे (पश्चिम) 400604
ई-मेलआयडी- dhozpthane@rediffmail.com dhothanestore@gmail.com

जाहीर GeM ई-निविदा सूचना

आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात कार्यरत प्राथमिक आरोग्य केंद्रात जैव वैद्यकीय घनकचरा शास्त्रोत्र व पर्यावरण पूरक पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी Biomedical Waste Machine खरेदी करावयाची आहे. त्याकरीता https://gem.gov.in या संकेतस्थळावर सदर यंत्राची ई-निविदा Online पद्धतीने मागविण्यात येत आहे.

ई-निविदा सूचना (प्रथम प्रसारण)

कामाचे नाव आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राना Biomedical Waste Machine (20 लिटर क्षमता असलेली) 3 नग पुरविणे

- GeM Portal निविदा प्रसिद्ध दि २८/०१/२०२५ पासून
- निविदा अंतिम दि.१०/०२/२०२५ संध्या. १८.०० पर्यंत

सदर ई-निविदांचा नमुना ऑनलाईन पध्दतीने https://gem.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध आहे. या ई-निविदा संबंधित सर्व माहिती व निविदेच्या अटी शर्ती, तांत्रिक विनिदेश संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर निविदा फक्त इंटरनेटवरुनच Online पद्धतीने भरता / दाखल करता येईल. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचे अधिकार या विभागाने राखून ठेवले आहेत.

सही/-
डॉ. गंगाधर परगे
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

सही/-
रोहन घुगे (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

जावक क्रमांक : ठाजिप/आवि/भांडार/वशि/९४१/२५ आरोग्य विभाग जिल्हा परिषद ठाणे
दिनांक : ३१/०१/२०२५

# महिलांच्या प्रश्नांवर पंचशीला पवारांनी घेतली आयुक्तांची भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर हे बहुजन बहुजन व झोपडपट्ट्यांचा शहर, तसेच उद्योग नगरी असल्याने अनेक महिला कामगारही या शहरात मोठ्या प्रमाणात येतात. महिलांचे शैक्षणिक, स्वास्थ आणि मूलभूत अधिकारां बाबत उल्हासनगर मनपाचे लक्ष वेधून घेण्यासाठी उपमहापौर पंचशीला नाना पवार यांनी शिष्टमंडळासह नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांची नुकतीच भेट घेतली.

यादरम्यान शहरातील झोपड पट्ट्यांमधील शौचालयांच्या दुरावस्थेमुळे महिलांची होणारी कुचंबना, तसेच पाणीटंचाई मुळे होणारे हाल आणि महिला बचत गटांच्या उत्कर्षासाठी नवनवीन योजनांची आवश्यकता याबाबत पंचशीला पवार यांनी आयुक्तांशी चर्चा केली. ज्यास आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच उपायोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी पंचशिला पवार यांच्या सोबत आर पी आय राज्य सचिव नाना पंवार, माजी नगरसेविका लता शांताराम निकम, नेहा पवार आदी उपस्थित होत्या.

# खालापूर पोलिसांची विद्यार्थ्यांना मदत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्हा पोलीस अंतर्गत खालापूर पोलीस ठाणे व खालापूर तालुका पोलीस पाटील संघटना यांच्यामार्फत पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या संकल्पनेतून समाजासाठी काहीतरी करावं या हेतूने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप 30 जानेवारी रोजी पेण एज्युकेशन सोसायटी संचलित नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी येथे शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला.या कार्यक्रमासाठी पोलिस उपनिरीक्षक वावोशी अलोक खीसमतराव , वावोशी गावचे पोलीस पाटील मनीष हातनोलकर वावोशीच्या सरपंच सौ अश्विनी उदय शहासणे ,ग्रामपंचायत सदस्य मयूर धारवे व सौ. रिया वालम शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. शीतल यादव तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष वैशंपायन आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका सौ विद्या धनाजी घरत यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका सौ मानसी केदारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक सुनील पवार, विद्या शेट्ये, आरती पाटील व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# जिल्हा परिषद घेणार कुष्ठ रुग्णांचा शोध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : केंद्र शासनाने २०२७ पर्यंत कुष्ठरोग रुग्णांची संख्या शुन्य करण्याचे धोरण आखले आहे त्याअनुषंगाने आरोग्य विभागाच्यावतीने दि. ३१ जानेवारी, २०२५ ते १४ फेब्रुवरी, २०२५ या कालावधीत ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी विभागामध्ये कुष्ठरोग शोध मोहीम (LCDC) ही माहीम १४ दिवस राबवण्यात येणार आहे. कुष्ठरोग शोध मोहीम (LCDC) ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. गीता काकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, यांनी जिल्ह्यातील सर्व यंत्रणेला निर्देशित केले आहे.

समाजात असलेल्या प्रत्येक संशयित कुष्ठरुग्णांचा शोध पथकांमार्फत घेवून त्याचे निदान निश्चित करणे व निदान झालेल्या कुष्ठरुग्णांना तात्काळ बहुविध औषधोपचार सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने कुष्ठरोग अभियान सुरु केले आहे. ठाणे जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ अखेर ७११ कुष्ठ रुग्णांची नोंद कुष्ठरोग विभागाने केली आहे. वेदना नसल्याने अनेकवेळा रुग्ण या आजाराकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे याकडे दुर्लक्ष न



करता वेळेत निदान करण्यासाठी कुष्ठरोग विभागाकडून आवाहन करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात समाजाaतील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे तसेच नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचारांद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे. समाजात कुष्ठरोग विषयी जनजागृती करणे, हे या मोहिमेच मुख्य उद्दीष्ट आहे.

या बाबत जिल्हा समन्वय समितीची सभा दि. १३ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. तसेच आरोग्य कर्मचारी, आशा व स्वयंसेवक यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील मनुष्य बळाची माहिती घेवून त्यानुसार सूक्ष्म कृती आराखडा बनवुन त्याप्रमाणे कुष्ठरोग शोध मोहिमेचे नियोजन करण्यात आलेले आहे. ग्रामीण भागातील २६ लाख ८४ हजार ८९४ तर शहरी भागातील १४ लाख ६४ हजार ०४१ निवडलेल्या जोखीम ग्रस्त भागातील एकूण ४१ लाख ४८ हजार ९३५ लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे आणि मोहिमेचे सर्व स्तरावर प्रभावी संनियंत्रण व पर्यवेक्षण करण्यासाठी २ हजार ५३२ गटांकडून काम करण्यात येणार आहे.

कुष्ठरोग रुग्णांची तपासणी करण्यात येणार असून अति जोखमीच्या भागात राहणाऱ्या समाज घटकांना कुष्ठरोगाची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

## कुष्ठरोगाची लक्षणे

- कुष्ठरोग जिवाणूमुळे होणारा सांसर्गिक आजार आहे
- अंगावर असणारा फिक्कट, लालसर रंगाचा बधिर चट्टा व हाता पायामध्ये अशक्तपणा येणे ही कुष्ठरोगाची प्रमुख लक्षणे आहेत.
- कानाच्या पळया जाड होणे व चेहरा लालसर, तेलकट व जाड होणे
- त्वचेशी संलग्न मज्जा जाड व दुखऱ्या होणे
- कुष्ठरोग सर्व वयोगटातील व्यक्तींना होऊ शकतो.

## कुष्ठरोगामुळे येणारी विकृती:-

- Grade I विकृती : यामध्ये तळहाताला किंवा तळपायाला बधिरता येते. संवेदना नसल्याने गरम वस्तु पकडल्याने किंवा काही टोचल्याने तळ हाताला किंवा तळ पायाला जखमा पडु शकतात ज्या वर्षानुवर्षे बसत नाहीत.
- Grade II विकृती : या प्रकारच्या विकृती डोळ्यांनी दिसण्यासारखी असते जसे की हात पायाची बोटे वाकडी होणे, मनगट लुळे पडणे, पाय लुळा पडणे, तळहाताला तळपायाला जखमा पडणे, डोळ्यांच्या पापण्या पूर्णत: बंद न करता येणे अशा प्रकारच्या विकृती ग्रेड टु च्या कुष्ठरोगमध्ये येते.

# भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुद करा

## - खासदार सुरेश म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय अर्थसंकल्प 2025 मध्ये विशेष निधीची तरतूद करण्याची मागणी खासदार सुरेश म्हात्रे (बाळया मामा) यांनी केली आहे. भिवंडी आणि त्याच्याभोवतीच्या क्षेत्रात पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, उद्योग, रोजगार, आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील सुधारणा करण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी सरकारकडून आवश्यक निधी आणि योजना मिळवण्यासाठी ते सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत आहेत.

भिवंडी स्थानकावरून नियमित लोकल ट्रेन सेवा सुरू करण्यासाठी विशेष निधी मंजूर करावा. भिवंडी रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी निधीची तरतूद केली जावी. भिवंडीला राष्ट्रीय महामार्गांसोबत चांगली जोडणी मिळवण्यासाठी विशेष प्रकल्प राबवले जावेत. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नवीन उड्डाणपूल व विस्तारित रस्त्यांचे काम तातडीने सुरू करावेत. शहापूर येथे एक नवीन एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल मंजूर करावा. भिवंडीमध्ये केंद्रीय विद्यालय सुरू करावा, जेणेकरून सीबीएसई शिक्षणाची गुणवत्ता वाढवता येईल.

भिवंडीमध्ये ५०० बेडचे अत्याधुनिक जिल्हा रुग्णालय सुरू करावे. मेडिकल कॉलेज मंजूर करून भिवंडीला वैद्यकीय शिक्षणाचे एक महत्त्वाचे केंद्र बनवावे. भिवंडीच्या वस्त्र उद्योग आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी करसवलती, अनुदाने व आर्थिक मदतीच्या योजनांचा लाभ मिळवावा. कामगारांसाठी विशेष कल्याण योजना आणि कर्ज सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. भिवंडी आणि शहापूरसाठी जल जीवन मिशन अंतर्गत अतिरिक्त निधी मंजूर करावा, जेणेकरून प्रत्येक गावाला स्वच्छ पाणीपुरवठा होईल. भिवंडीमध्ये स्मार्ट लॉजिस्टिक पार्क तयार करावा. रेल्वे, रस्ते आणि लॉजिस्टिक सुविधांची सुधारणा केली जावी. आदी भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या प्रमुख मागण्या सुरेश म्हात्रे यांनी केल्या आहेत.भिवंडी लोकसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्र सरकारचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी वाहतूक, शिक्षण, आरोग्य, उद्योग, लॉजिस्टिक्स आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे आवश्यक आहे. या बजेटमध्ये भिवंडीकरांसाठी आवश्यक योजनांना मंजुरी मिळावी, यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत आहे," असे खासदार सुरेश म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

# टिटवाळ्यात ९० फुटी रस्त्याची दुर्दशा

## प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा नागरिकांना त्रास

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : प्रसिद्ध गणपती मंदिरामागील ९० फुटी रिंगरूट रस्ता सध्या खड्डयांमुळे पूर्णतः विद्रूप झाला आहे. नागरिक आणि गणेशभक्तांना यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. एमएमआरडीएने या रस्त्याचे काम सुरू केले असले तरी काही घरांच्या अडथळ्यामुळे काम अर्धवट सोडण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे, विशेषतः एका मोठ्या खड्डयामुळे जीवघेणा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या गणेशोत्सवादरम्यान स्थानिक पत्रकारांनी कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त इंदू राणी जाखड यांच्याकडे रस्ता दुरुस्तीची मागणी केली होती. त्यांनी तत्काळ बांधकाम अभियंता जगदीश कोरे यांना आदेश दिले होते. मात्र, या आदेशांची अंमलबजावणी न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या माघी गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने



भाविक टिटवाळा मंदिरात येणार आहेत. मुख्य रस्त्याऐवजी बाह्यवळण मार्गाने वाहतूक वळवली जाणार असल्याने वाहतूक कोंडीची शक्यता आहे. खड्डेमय रस्ता असल्याने रात्री अपरात्री अपघाताची भीती अधिक आहे.

स्थानिक रहिवासी उमेश जाधव यांनी बांधकाम उपअभियंता अरुण इनामदार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उद्धटपणे संवाद साधल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांची बेफिकीर वृत्ती महापालिकेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

रस्ता तातडीने दुरुस्त न केल्यास नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. अभियंता जगदीश कोरे यांनी पाहणी करून लवकरात लवकर डागडुजी करण्याचे आदेश दिल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात काहीच कृती झालेली नाही.

प्रशासनाने तातडीने या रस्त्याच्या दुरुस्तीची कार्यवाही करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे होणाऱ्या संभाव्य अपघातासाठी जबाबदार कोण, हा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

या संदर्भात बांधकाम अभियंता जगदीश कोरे यांना विचारणा केली असता रस्त्याची पाहणी करून तातडीने डागडुजी करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, अद्याप कोणतीही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नाही.

### आयुक्तांचे आदेश धाब्यावर अधिकाऱ्यांची बेफिकीरी

### अपघाताचा धोका वाढला..

स्थानिक रहिवासी उमेश जाधव यांनी याबाबत बांधकाम उपअभियंता अरुण इनामदार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी उद्धट भाषेत संवाद केल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे. अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारची वर्तणूक प्रशासनाच्या निष्क्रीयतेचे प्रतीक असल्याचे नागरिकांचे मत आहे. आयुक्तांच्या स्पष्ट आदेशानंतरही अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे, संतप्त स्थानिक रहिवासी आणि गणेश भक्तांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# ग्रामदेवता कुर्लाई मंदिराचा वर्धापनदिन साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सफाळे / कुर्लाई माता मंदिर ग्रामस्थ मंडळ सरतोडी, सफाळे पुर्व- ता. जि. पालघर. यांच्या द्वारे माघ शुद्ध ६ शके १९४६ सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी, श्री. कुर्लाई माता मंदिर, ग्रामस्थ मंडळ, सरतोडी, (सफाळे) येथील मंदिराचा १४ वा वर्धापनदिन सोहळा व भंडारा आयोजित करण्यात आला आहे

कार्यक्रम आयोजन, सोमवारी दिनांक ३ फेब्रुवारी रोजी, सकाळी ८ वाजता, मंदिरात मातेच्या मुर्तीला अभिषेक, ९- ३० ला होम हवन. दुपारी १२ च्या वेळेत मातेची महाआरती, नंतर २ वाजे नंतर श्री. कुर्लाई आईची पालखी व मिरवणूक. संध्याकाळी ७ नंतर मंदिर भक्त गण/ भाविक यांच्या कडून किर्तन व भजनाचा कार्यक्रम करण्यात येणार आहे. तसेच संध्याकाळी ६ नंतर दर्शनार्थी येणारे परिसरातील भक्त - गण, भावीक, ग्रामस्थ, यांच्या साठी श्री. कुर्लाईमाता मंदिर ग्रामस्थ मंडळ सरतोडी यांच्या कडून महाप्रसाद / भंडारा ठेवण्यात आला आहे. तर भाविकांनी महाप्रसादाचा आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ॲग्रीस्टॅक योजनेचे सर्व्हर डाऊन

## शेतकरी नाराज



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : ॲग्रीस्टॅक अंतर्गत चालु करण्यात आलेल्या कॅम्पद्वारे शेतकऱ्यांची नोंदणी करणे बाबत केंद्र शासनाच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर अंतर्गत ॲग्रीस्टॅक हा प्रकल्प संपूर्ण देशामध्ये राबविणे बाबत महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाने दिनांक १४.१०.२०२४ रोजी शासन निर्णय पारित केला आहे. त्या अनुषंगाने ॲग्रीस्टैंक संकल्पनेच्या शेतकरी ओळख क्रमांक निर्मिती प्रक्रियेस गतिमान करण्यासाठी आता राज्यात नागरी सुविधा केंद्र (CSC) ची मदत घेऊन शेतकरी ओळख क्रमांक निर्मितीचा निर्णय घेतला आहे. परंतु ॲग्रीस्टॅक चे सर्वर वारंवार डाऊन व स्लो चालत आसल्याने शेतकऱ्यांना तासनतास csc केंद्रावर कामधंदा सोडुन थांबावे लागते परिणामी थांबून सुध्दा ॲनलाईन होईल याची खात्री नसते. ग्रामीण भागातील शेतकरी ॲग्रीस्टॅक ॲनलाईन करण्यासाठी csc केंद्रावर दूरवरून चालत येतात परंतु सर्वर डाऊन आसल्याने निराश होऊन परत जावे लागत आहे. तलाठी व csc केंद्चालक यांच्या मार्फत गावो गावी जाऊन कॅम्प चे आयोजन करण्यात आले आहेत. परंतु सर्वर चा इशु येत आसल्याने csc चालकाला सुद्धा शेतकऱ्याच्या रोशाला सामोरे जावे लागत आहे.

शेतकरी ओळख क्रमांक हा शेतकऱ्यांच्या अत्यंत फायद्याचा असा प्रकल्प आहे. यापुढे प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा तसेच शासनाच्या अन्य योजनेसाठी शेतकरी क्रमांक आवश्यक आहे. पी एम किसान योजना, शेतकरी कर्ज वितरण सुलभता, पिक विमा योजना, पीक हमीभाव खरेदीसाठी मदत, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण, महा डी बी टी वरील कृषी विभागाच्या सर्व योजना तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कृषी बाबतच्या सर्व योजनांसाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक असणार आसल्यामुळे शेतकरी ॲग्रीस्टॅक नोंदणी करण्यासाठी शेतीची कामे बाजूला ठेवून csc केंद्रावर जात आहेत परंतु शेतकरी निराश होवुन परत घरचा रस्ता धरत आहे. सदर योजनेच्या सर्वचे काम शासनाने व्यवस्थित करावे नंतर शेतकऱ्यांना ऑनलाईन करण्याची घोषणा करावी आसे मत शेतकरी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंदराव वाकडे

## राज्य कार्यकारिणीवर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : पुणे - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, न्यूज १८ चे ज्येष्ठ पत्रकार गोविंदराव वाकडे यांची प्रदेशाध्यक्ष पदी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत निवड करण्यात आली आहे. तर अहिल्या नगर जिल्हयातून दैनिक लोकआवाज चे पारनेर तालुका प्रतिनिधी सुरेश खोसे पाटील यांची राज्य कार्यकारिणी वर निवड करण्यात आली . राज्यभरातील पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी ही कार्यकारिणी नवे धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे सांगण्यात आले.

या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, ऑल इंडिया जनरल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रणधीर कांबळे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष निलेश सोमणी, सोशल मीडिया अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रदेश



संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी मानले.

प्रदेशाध्यक्ष पदी गोविंद वाकडे , प्रदेश कार्याध्यक्ष पदी निलेश सोमानी , इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्ष पदी अतुल परदेशी , सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष पदी सिद्धार्थ भोकरे , प्रदेश उपाध्यक्ष पदी अशोक देडे , किशोर रायसाकडा , डॉ. अभय कुमार दांडगे , नितीन शिंदे , महेश पानसे , आरोग्य सेल प्रदेशाध्यक्ष पदी डॉ. अमित कुमार खाडे , पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रमुख पदी किशोर पाटील , मंत्रालय संपर्कप्रमुख पदी नितीन जाधव , सांस्कृतिक विभाग प्रमुख पदी संदीप भटेवरा , संघाचे प्रवक्ते पदी रमेश डोंगरे यांची निवड करण्यात आली .

विदर्भ प्रमुख पदी नयन मोंढे , अमरावती विभागीय अध्यक्ष पदी सुनील फुलारी, शैलेश पालकर , नागपूर विदर्भ प्रमुख पदी अनुपम कुमार भागरव , उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख पदी भुवनेश दुसाने , पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष पदी नितीन शिंदे , पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव पदी संजोग काळदंते , मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदी अनिल सावंत , कोकण विभागीय अध्यक्ष पदी शैलेश पालकर , कायदेविषयक सल्लागार पदी ॲड. रचना भालके .

प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून मुंबई चे प्रशांत कांबळे , स्वामी शिरकुल वैदु , नांदेड चे संग्राम मोरे , सोलापूर चे स्वामीराव गायकवाड , ठाणे चे सुभाष विसे ,कोल्हापूर चे बाजीराव फराकटे , अहिल्यानगरचे सुरेश खोसे पाटील व अनिल रहाणे ,ठाणे चे श्रद्धा ठोंबरे , नाशिक चे लक्ष्मण डोळस ,सिंधुदुर्ग चे सिताराम गावडे धाराशिव चे अरुण लोखंडे ,नागपूर चे शरद नागदेवे नांदेड चे रुपेश पाडमुख संभाजी नगर चे प्रभू गोरे सोलापूर चे राजेंद्र कोरटे-पाटील संभाजी नगर चे कुंडलिक वाळेकर नंदूरबार चे रवींद्र गुरव जळगाव चे अबरार मिर्झा साताऱ्याचे संतोष खालकर वाशिमचे पंकज सोनवणे धुळ्याचे प्रा .जसपाल सिसोदिया (धुळे) , नवनाथ जाधव प्रदेश प्रसिद्धी प्रमुख तर सहाय्यक विनोद कोळी , प्रदेश संपर्कप्रमुख पदी वैभव स्वामी

गुजरात प्रांतिक अध्यक्ष म्हणून रमजान मंसुरी , मध्य प्रदेश अध्यक्ष म्हणून मनीष महाजन , दिल्ली संपर्कप्रमुख म्हणून राजश्री चौधरी , रघुनाथ सोनवणे , गोवा संपर्कप्रमुख म्हणून आबा खवणेकर यांची निवड करण्यात आली .

या बैठकीत पत्रकारांच्या संरक्षण आणि हक्कांसाठी संघटनेने महत्त्वाचे निर्णय घेतले , पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीची मजबूत कार्यप्रणाली तयार करून पत्रकारांवरील हल्ल्यांना वाचा फोडण्याचा निर्णय , महिला पत्रकारांसाठी विशेष सुरक्षा आणि मदत केंद्र निर्माण करण्याचा प्रस्ताव , राज्यातील विविध जिल्ह्यांतील पत्रकारांसाठी कायदेशीर मदत आणि तक्रार निवारण प्रणाली उभारण्याचा मानस , शासनाच्या विविध योजनांचे सर्वेक्षण करून त्या योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी सरकारकडे अहवाल सादर करणे , पत्रकारांसाठी प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शन सत्रे आणि डिजिटल पत्रकारितेवर विशेष कार्यशाळांचे आयोजन.

राज्यातील पत्रकारांसाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या या नव्या कार्यकारिणीने पत्रकारांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. नवीन पदाधिकाऱ्यांना राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. संघटनेच्या नेतृत्वाने स्पष्ट केले की, महाराष्ट्रातील पत्रकारांच्या विकासासाठी आणि त्यांच्या संरक्षणासाठी ही संघटना लढा देत राहील .

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024